Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/४४ दिनांक : १६/०६/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/समन्वयक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :– विद्यार्थी विकास कक्षाच्या प्रमुखांसाठी आयोजित एकदिवशीय कार्यशाळेसाठी उपस्थित राहणेबाबत.

महोदय/महोदया,

या विभागामार्फत सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्षाच्या प्रमुखांसाठी दि. ०५/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता राजर्षी शाहू सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत येथे एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सदर कार्यशाळेमध्ये या विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सांगण्यात येणार आहे. तसेच महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी घ्यावयाच्या विविध कार्यक्रमाबद्दल तज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत.

तरी आदेशान्वये कळविण्यात येते की, दि. ०५/०७/२०२५ रोजी होणाऱ्या कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्षाच्या प्रमुखांना पाठवून देण्यात यावे व त्यांचे नाव व माहिती खाली नमुद केलेल्या गुगल लिंकमध्ये दि. २८/०७/२०२५ पर्यत भरण्यात यावी हि विनंती.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५६ (२) (क) (ख) या तरतूदीनुसार विद्यार्थी विकास कक्षामार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्षांच्या प्रमुखांना पाठवून देण्यात यावे. ज्या शिक्षकांच्या नावाची नोंदणी करण्यात येणार आहे त्यांनाच कार्यशाळेसाठी पाठवून द्यावे.

गतवर्षी ज्याच्या नावाची नोंदणी केलेली होती ते शिक्षक उपस्थित न राहता ऐनवेळी दुसरे शिक्षक उपस्थित राहिल्यामुळे प्रमाणपत्र देताना अडचण झाली होती. त्यामुळे ज्याच्या नावाची नोंदणी करण्यात येणार आहे त्यांनाच कार्यशाळेसाठी पाठवून देण्यात यावे.

गुगल लिंक : https://forms.gle/MqBHbz7ivW5AZQnc6

कळावे,

आपला विश्वासू

प्र संचालक
विद्यार्थी विकास

टिप: वरीलप्रमाणे विद्यार्थी विकास कक्षाच्या कार्यशाळेमध्ये उपस्थित राहण्यासाठी होणारा प्रवास खर्च ज्या त्या महाविद्यालयाने करावयाचा आहे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## विद्यार्थी विकास कक्ष एक दिवशीय कार्यशाळा

दि. ०५/०७/२०२५ वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.००

# कार्यक्रम पत्रिका

| वेळ | तपशिल |
|---|---|
| स. १०.०० ते स. ११.०० | नोंदणी |
| स. ११.०० ते दु. ०१. ३० | प्रथम सत्र |
| दु. ०१.३० ते दु. ०२.३० | भोजन |
| दु. ०२.३० ते सायं. ०४.३० | द्वितीय सत्र |
| सायं. ०४.३० ते सायं. ०५.०० | समारोप |

स्थळ : राजर्षी शाहू सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर